# डॉ. होमी भाभा स्टेट विद्यापीठ मुंबई

प्रसिद्धी पत्रक

दिनांक- १० जून, २०१९

## डॉ. होमी भाभा स्टेट विद्यापीठाच्या प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ

मुंबई- राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान आणि महाराष्ट्र शासनाने राज्यात नव्याने स्थापन केलेल्या डॉ. होमी भाभा स्टेट विद्यापीठातील पदवीच्या प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेला मुदतवाढ देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळाच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांना गुणपत्रिकेच्या अनुपलब्धतेमुळे होणारी गैरसोय टाळण्यासाठी विद्यापीठाने हा विद्यार्थीकेंद्रीत महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. याअनुषंगाने विद्यापीठाने सुधारीत वेळापत्रक निर्गमित केले आहे.

### प्रवेश प्रक्रियेचे सुधारीत वेळापत्रक

- अर्ज विक्री - २९ मे २०१९ ते १५ जून २०१९ पर्यंत (कार्यालयीन दिवस)
- प्रवेश अर्ज महाविद्यालयात सादर करण्याची तारीख – ०७ जून २०१९ ते १५ जून २०१९ (कार्यालयीन दिवस ) **(इन हाऊस एडमिशन या कालावधीत करता येईल.)**
- पहिली मेरीट लिस्ट – १७ जून २०१९ ( सायंकाळी ५.०० वाजता)
- कागदपत्रे पडताळणी आणि शुल्क भरणे – १८ जून २०१९, २० जून २०१९ (दुपारी.२.०० वाजे पर्यंत (**कार्यालयीन दिवस** )
- द्वितीय मेरीट लिस्ट – २० जून २०१९ ( सायं. ५.०० वा.)
- कागदपत्रे पडताळणी आणि शुल्क भरणे – २१, २२ आणि २४ जून २०१९ ( दुपारी.२.०० वाजे पर्यंत
- तृतीय आणि शेवटची मेरीट लिस्ट - २४ जून २०१९ ( सायं. ५.०० वा.)

- कागदपत्रे पडताळणी आणि शुल्क भरणे – २५ जून २०१९, ते २७ जून २०१९ ( सायं.५.०० वाजे पर्यंत (**कार्यालयीन दिवस** )

**उपलब्ध जागा**

**एलफिन्स्टन महाविद्यालय-**

**बीए १२०, बीकॉम-२४०, बीएस्सी-१२०, बीएस्सी (आयटी) -६०, बीएस्सी बायोटेक-४०**

**सिडनहॅम महाविद्यालय-**

**बीकॉम-६००, बीएमएस-१२०, बीबीआय-१२०, एमकॉम (अकॉउंट, बँकिंग एण्ड फायनान्स:२४०**

यातील एलफिन्स्टन महाविद्यालय आणि सिडनहॅम महाविद्यालय मुंबई येथे पदवीच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऑफलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. यामध्ये एलफिन्स्टन महाविद्यालयातील बीए, बीकॉम, बीएस्सी, बीएस्सी (आयटी) बीएस्सी (बायोटेक) या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाला प्रवेशित होऊ इच्छिणाऱ्या तर सिडनहॅम महाविद्यालयातील बीकॉम, बीएमएस, बीबीआय आणि पदव्युत्तर साठी एमकॉम (अकाऊंट अँड बँकींग अँड फायनान्स) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाला प्रवेशित होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्या-त्या महाविद्यालयातील प्रवेश-पुस्तिकेतील सुचनेनुसार ऑफलाईन पद्धतीने प्रवेश घ्यायचे आहेत. या प्रवेश प्रक्रियेसंदर्भात विद्यापीठाने निर्गमीत केलेल्या वेळापत्रकानुसार प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार आहे.

डॉ. लीलाधर बन्सोड, उपकुलसचिव (जनसंपर्क / प्रकाशने / सांख्यिकी ) मुंबई विद्यापीठ